**ठळक बातम्या**

- विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी समर्पणाच्या भावनेची गरज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- महाराष्ट्रात जळगाव इथं प्रधानमंत्र्यांचा लखपती दिदींशी संवाद

- कोलकाता इथल्या आरजी कर रुग्णालयमधल्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी सीबीआयचा तपास सुरु

- टेलिग्राम या संदेशवाहक ॲप्लिकेशनचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पावेल ड्यूरोव यांना पॅरीस इथं अटक

**आणि**

- महाराष्ट्राच्या अनेक भागात संततधार पाऊस / पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे आणि सातारा जिल्ह्यात पावसाचा रेड अलर्ट

**<><><><><><>**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी, राजकीय पार्श्वभूमी नसतानाही अनेकांनी स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून दिलं, विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी आज अशाच भावनेची गरज आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११३वा भाग होता.

आज  मोठ्य़ा संख्येनं युवा राजकारणात यायला तयार आहेत, त्यांना केवळ योग्य मार्गदर्शन आणि योग्य संधीची गरज आहे असं त्यांनी सांगितलं. युवकांनी या

अभियानात स्वतःला जोडून घ्यावं असं आवाहन करतानाच, युवकांचं हे पाऊल देशाचं भविष्य बदलवून टाकणारं ठरेल असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री**

यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राबवल्या गेलेल्या हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्याचं त्यांनी सांगितलं. या निमित्तानं देशभरात अभिनव पद्धतीनं काढलेल्या तिरंगा यात्रांची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. जेव्हा लोक एकत्र येऊन आपल्या भावना प्रकट करतात तेव्हा अशा प्रकारची अभियानं प्रचंड यशस्वी होतात असं ते म्हणाले. स्वातंत्र्य दिन आता एक सामाजिक पर्व झालं असून, या अभियानामुळे ई कॉमर्स मंचावर तिरंग्याच्या रंगाच्या सामानाची विक्री वाढत असल्याचं निरीक्षण त्यांनी आज मन की बात मध्ये नोंदवलं. या अभियानामुळे स्वातंत्र्य दिनाला देशाच्या प्रत्येक कोपऱ्यात जमीन, पाणी आणि आकाशातही आपल्या राष्ट्रीय ध्वजाचे रंग दिसले, या अभियानानं संपूर्ण देशाला एका सूत्रानं बांधलं असून, हाच एक भारत श्रेष्ठ भारत आहे असं ते म्हणाले.

आजच्या मन की बात मधून प्रधानमंत्र्यांनी प्राणी तसंच पर्यावरण संवर्धन आणि रक्षणासाठी देशाभरात सुरु असलेल्या काही अभिनव प्रयत्नांची, आणि अशा प्रयत्नांत योगदान देत असलेल्या तंत्रज्ञानाधारीत स्टार्ट अप्सची उदाहरणं श्रोत्यांसमोर मांडली. या क्षेत्रात अधिकाधिक स्टार्ट अप्स येऊ लागले तर त्यामुळे पशुपक्ष्यांच्या संरक्षणासोबतच, परंपराही टिकून राहतील असं ते म्हणाले. देशातली अनेक स्टार्टअप्स पर्यावरणाला चालना देण्याचं काम करत असल्याबद्दल त्यांनी आनंदही व्यक्त केला. आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले तर पर्यावरणाचं रक्षण होईल आणि देशही पुढे जाईल, असं ते म्हणाले.

आपल कुटुंब, समाज आणि आपल्या देशाचं भवितव्य आजच्या लहान मुलांवर अवलंबून आहे, त्यामुळेच या मुलांच्या मुलांचं पोषण ही देशाची प्राथमिकता असल्याचं ते म्हणाले. यादृष्टीनं मुलांच्या योग्य पोषण आहार मिळावा म्हणून सरकारच्या वतीनं राबवल्या जात असलेल्या धोरणात्मक उपाययोजनांची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली आणि प्रत्येकानं आपल्या क्षेत्रातल्या पोषणविषयक जागरूकता अभियानांशी जोडून घेण्याचं आवाहन त्यांनी केलं. प्रत्येकाच्या लहानशा प्रयत्नानं कुपोषणा विरोधातल्या लढ्याला मोठं बळ मिळेल असं ते म्हणाले.

नुकताच २३ ऑगस्टला देशानं पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा केल्याचं सांगताना, त्यांनी मागच्या वर्षी याच दिवशी भारताचं चांद्रयान तीन चंद्राच्या दक्षिण भागात शिव - शक्ती पॉइंट इथं यशस्वीपणं उतरल्याच्या कामगिरीला उजाळा दिला. यानिमीत्तानं त्यांनी अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातल्या गॅलेक्स आय या स्टार्ट अपच्या चमूशीही संवाद साधला. २१ व्या शतकातल्या देशातल्या घडामोडींमुळे विकसित भारताचा पाया मजबूत होत असल्याचं ते यावेळी म्हणाले.

संस्कृत भाषा संवर्धनासाठी देशात आणि जगात होत असलेल्या प्रयत्नांचा उल्लेख त्यांनी केला, आणि संस्कृतला प्रोत्साहन देण्यासाठीचे प्रयत्न सुरु ठेवण्याचं आवाहन त्यांनी केलं.

लवकरच पॅरिसमध्ये होणार असलेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत देशाचं प्रतिनिधीत्व करत असलेल्या आपल्या दिव्यांग खेळाडूंना चिअर फॉर भारत हा हॅश टॅग वापरून प्रोत्साहन द्यावं असं आवाहनही त्यांनी नागरिकांना केलं.

एक पेड मां के नाम या अभियानाची आठवण करून देत, प्रत्येकानं जास्तीत जास्त झाडं लावण्याचं - त्यासाठी इतरांना प्रोत्साहन देण्याचं, तसंच नागरिकांनी

पावसाळ्यात स्वतःची काळजी घेण्यासोबतच जलसंवर्धनांच्या मोहिमांमध्येही सहभागी होण्याचं आवाहनही त्यांनी आजच्या मन की बात मधून केलं.

येत्या काही दिवसात साजऱ्या होणाऱ्या जन्माष्टमी, गणेशोत्सव, ओणम, मिलाद उन नबी या सणांसह तेलुगू भाषा दिनाच्या शुभेच्छा त्यांनी नागरिकांना दिल्या.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज महाराष्ट्रात जळगाव इथं देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या लखपती दीदींशी संवाद साधला. महिला स्वयंसहायता गटांना अडीच हजार कोटी रुपयांच्या सामूहिक गुंतवणूक निधीचं वितरण तसंच ५ हजार कोटी रुपयांच्या कर्जाचं वितरण यावेळी करण्यात आलं. ३० हजार ठिकाणच्या ११ लाख महिलांना प्रातिनिधिक स्वरुपात लखपती दीदी प्रमाणपत्रं देण्यात आली.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, आदि मान्यवर वाघ  कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

लखपती दीदी मेळाव्यात भाग घेण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आज छत्रपती संभाजीनगर मार्गे जळगावात आगमन झालं. छत्रपती संभाजीनगर विमानतळावर गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे, पालकमंत्री अब्दुल सत्तार, यांच्यासह स्थानिक खासदार- आमदार, तसंच जिल्हाधिकारी पोलीस आयुक्त आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी प्रधानमंत्र्यांचं स्वागत केलं.

जळगाव विमानतळावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी मदत, पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आदी मान्यवर उपस्थित होते. प्रधानमंत्र्यांनी विमानतळावर उपस्थित लखपती दिदींशी संवाद साधला.

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन देखील या कार्यक्रमासाठी जळगावात आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार देखील कार्यक्रमासाठी जळगावात आले असून त्यांचं स्वागत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केलं.

<><><><><><>

कोलकाता इथल्या आरजी कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयामधल्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी सीबीआयनं आज सकाळी १५ ठिकाणी भेट देऊन तपासणी केली. सीबीआयचं पथक आरजी करचे माजी प्राचार्य डाॅ संदीप घोष यांची त्यांच्या निवासस्थानी चौकशी करत आहेत. तसंच सीबीआय महाविद्यालयातचे नवे प्राचार्य आणि उपप्राचार्य यांची चौकशी करत आहे. याशिवाय आरजी करचे प्राध्यापक डॉ. देबाशीष सोम, माजी वैद्यकीय अधीक्षक आणि उपप्राचार्य डॉ. संजय वशिष्ठ आणि वैद्यकीय सामुग्री पुरवठादार बिप्लव सिंग यांची देखील सीबीआय त्यांच्या निवासस्थानी चौकशी करत आहेत.

<><><><><><>

नेपाळ बस दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या २५ जणांचे पार्थिव देह भारतीय वायुसेनेच्या विशेष विमानानं काल महाराष्ट्रात जळगाव इथं आणण्यात आले. रुग्णवाहिकेतून त्यांच्या मूळ गावी नेण्यात येऊन आवश्यक प्रक्रियेनंतर हे पार्थिव देह त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितलं की, या अपघातात जखमी झालेल्यांवर नेपाळमध्येच रुग्णालयात

उपचार सुरू असून त्यातील एकाची प्रकृती गंभीर आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून या अपघातातील प्रत्येक मृताच्या वारसाला २ लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये सानुग्रह मदत स्वरूपात दिले जाणार आहेत.

<><><><><>

मंकी पॉक्स विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाकडून पुणे जिल्ह्यात प्रतिबंधात्मक उपाय राबवण्यात येत आहेत. सिंगापूर आणि दुबई इथून आलेल्या ५३१ प्रवाशांची तपासणी पुणे विमानतळावर गेल्या सहा दिवसांत करण्यात आली. यात एकही संशयित रुग्ण आढळला नाही. मात्र खबरदारीचा उपाय म्हणून या प्रवाशांची तपासणी केल्याचं आरोग्य विभागानं सांगितलं.

<><><><><>

टेलिग्राम या संदेशवाहक ॲप्लिकेशनचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पावेल ड्यूरोव यांना फ्रान्समध्ये पॅरीस इथं काल अटक करण्यात आली. टेलिग्राम या समाजमाध्यमावर गुन्हेगारी कारवायांना प्रसिद्धी मिळू नये, यासाठी नियंत्रक नेमलेला नाही, असा आरोप त्यांच्यावर आहे.

<><><><><>

चीनमध्ये चेंगडू इथं सुरू असलेल्या आशिया १७ आणि १५ खालील कनिष्ठ गट बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या तन्वी पात्रीनं १५ वर्षांखालील मुलींच्या एकेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. तन्वीने अंतिम लढतीत व्हिएतनामच्या गुयेन थि थू ह्युगेनचा २२-२०, २१-११ असा पराभव केला.

१७ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत, ग्यान दत्तूला मात्र कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता

२५ ऑगस्ट २०२४ - रविवार

**<><><><><><>**

महाराष्ट्रात मुंबईसह अनेक भागात आज संततधार पाऊस सुरू आहे. राज्यातल्या **पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे आणि सातारा** जिल्ह्यात पावसाचा रेड अलर्ट हवामान विभागानं जारी केला आहे. मराठवाडा आणि विदर्भात जोरदार पाऊस पडण्याचा अंदाजही हवामान विभागानं वर्तवला आहे.

**राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, आसाम आणि मेघालय** या राज्यांमध्ये अति मुसळधार पाऊस पडणार असल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे. **उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणामध्येही** जोरदार पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><><>//**